# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


**राज्य सेवा (पूर्व) परीक्षा -२०११ क्रमांक १४७७(१)/२०११/तीन**

## जाहिरात क्रमांक : ४७/२०१०

निम्नलिखित पदांकरिता राज्य सेवा (पूर्व) परीक्षा -२०११ ही **रविवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०११** रोजी महाराष्ट्रातील विविध **३५ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | पोलीस उप अधिक्षक /सहायक पोलीस आयुक्त, गट अ (एकूण ३२ पदे) | ८ | ७ * | ४ * | २ * | -- | -- | ३ * | -- | ८ * |
| | महिला - | २ | २ | १ | १ | -- | -- | १ | -- | २ |
| २ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट - अ (उच्च श्रेणी)(एकूण ५ पदे) | ३ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | महिला - | २ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | अपंग - | @ अंध/मंददृष्टी (Low-Vision) १ | | | | | | | | |
| ३ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट ब (एकूण ७६ पदे) | आरक्षणाचा तपशील मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत नमूद करण्यात येईल. | | | | | | | | |
| ४ | उप अधिक्षक, भूमी अभिलेख,गट-ब (एकूण ४पदे) | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | महिला - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | नायब तहसिलदार, गट- ब (एकूण १२६ पदे) | ८३ | २१ | ८ | ३ | ५ | -- | २ | -- | ४ |
| | महिला - | २५ | ६ | २ | १ | २ | -- | १ | -- | १ |
| | खेळाडू - | ४ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ६ | गट विकास अधिकारी,गट ब(निम्न श्रेणी) (एकूण २ पदे) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २* |
| | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |

**२.१** उपजिल्हाधिकारी-गट अ, तहसिलदार- गट अ, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट अ उपनिबंधक, सहकारी संस्था, गट- अ., सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट ब, इत्यादी संवर्गाकरिता शासनाकडून पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. सदर पदे उपलब्ध झाल्यास मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत त्याबाबतचा तपशील देण्यात येईल.

**२.२ * अशी खुण केलेली पदे अनुशेषाची आहेत.**

**२.३ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.**

**२.४ महिलांसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.**

**२.५** अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील. बाब क्रमांक २.१ मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी काही संवर्गात शासनाकडून अपंगासाठी पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

**२.६** अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. **तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे.**

**३. वेतनश्रेणी :-**

**३.१** गट -अ च्या पदांकरिता रूपये १५,६००-३९,१००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**३.२** गट-ब च्या पदांकरिता रूपये ९,३००-३४,८००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**४. पात्रता :-**

**४.१. :-**भारतीय नागरीक

**४.२ वयोमर्यादा :-**

**४.२.१** दिनांक १ एप्रिल, २०११ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.२.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

**(१)** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत. **(२)** अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षापर्यंत.

**(३)** पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत. **(४)** माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत.

**(५)** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.३ शैक्षणिक अर्हता :-**

**४.३.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

**४.३.२** सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता भौतिकशास्त्र व गणित या विषयासह विज्ञान अथवा अभियांत्रिकी या शाखेतील पदवी

**४.३.३** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०११ करिता अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०११ चा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच ज्या पदासाठी अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल त्या पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास पूर्ण केली असली पाहिजे.

**४.३.४** सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

**४.३.५** पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट अ व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट ब या पदावरील नियुक्तीसाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवाराची शारीरिक अर्हता खाली दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे:-

**(एक) पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ :-**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ८४ से.मी. फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक. | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**(दोन) अधीक्षक, राज्य उत्पादनशुल्क, गट-अ व उपअधीक्षक राज्य उत्पादनशुल्क, गट-ब :-**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी.फुगविण्याची क्षमता- किमान ५ से.मी. आवश्यक | उंची-१५५ सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) |

**(तीन) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब :-**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ८४ से.मी. (कमीत कमी)फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी.आवश्यक, चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. | उंची-१६३ सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. |

**४.४ अपंग उमेदवारांसाठी पात्रता :-** शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** तसेच **" परीक्षा "** या विभागातील "राज्य सेवा परीक्षा" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६.** राज्यसेवा पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७.** उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद पदांपैकी अनु. क्र. २ व ४ वरील पदांना शासनाने दि. ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१०" लागू असल्याचे शासनाने कळविले असून, उर्वरित पदांसंदर्भातील माहिती मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत नमूद करण्यात येईल.

**८. शुल्क :**

**८.१** अमागास - **२६०/-**      **८.२** मागासवर्गीय - **१३५/-**

**८.३** सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**८.४** महाराष्ट्रातील भारतीय स्टेट बँकांच्या शाखांची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**९. अर्ज करण्याची पद्धत :-**

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**९.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १३ डिसेंबर, २०१० ते १० जानेवारी,२०११** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

**९.४** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

**९.५** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वत:चा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:ची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

**९.६ मदत :** अर्जाच्या ऑनलाईन स्वीकृतीच्या व्यवस्थेसाठी आयोगाने मे. वास्ट इंडिया प्रा. लि. या संस्थेची नियुक्ती केली असून, सदर संस्थेने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांच्या सोयीकरिता महाराष्ट्रातील तालुका स्तरावर व विविध प्रमुख शहरांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकृती केंद्र [Online Application Centre (OAC)] निश्चित केली आहेत. सदर केंद्रांची मदत उमेदवारांना घेता येईल. अशा केंद्रांची (OAC) ची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह उपलब्ध आहे. अधिकृत केंद्राचा पत्ता व मदत **9757444020** या दूरध्वनी क्रमांकावरुन उपलब्ध करुन घेता येईल. या केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात येणा-या सुविधेकरीता उमेदवाराला प्रत्येक परीक्षा / भरतीसाठी आयोगास अदा करावयाच्या शुल्काव्यतिरिक्त रु.24/- इतकी रक्कम सर्व्हिस चार्जेस म्हणून रोखीने संबंधित केंद्रचालकास अदा करावी लागेल. सदर मदत केंद्र संबंधित संस्थेने उमेदवारांच्या सोयीसाठी निश्चित केलेली असल्यामुळे आयोगाचा सदर केंद्रांशी काहीही संबंध नाही.

**१०.** आयोगामार्फत विज्ञापित करण्यात येणाऱ्या जाहिराती, निकाल, मुलाखतीचा कार्यक्रम, परीक्षा, इत्यादी संदर्भात नियमित व तात्काळ माहिती एस.एम.एस. सुविधेद्वारे उपलब्ध होण्यासाठी इच्छूक उमेदवारांनी www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करुन सदर अतिरिक्त सुविधेकरिता आवश्यक असलेले शुल्क भरावे. सदर सुविधा अतिरिक्त व ऐच्छिक आहे.

**११.** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यातील ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही **दिनांक १० जानेवारी, २०११** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद करण्यात येईल. चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये भरल्यानंतर बँकेकडून प्राप्त होणारा Transaction ID **दिनांक १० जानेवारी,२०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. Transaction ID ची नोंद अचूकरित्या विहित पद्धतीने व विहित कालावधीत न करणाऱ्या उमेदवाराचा अर्ज विनाशुल्क समजून नाकारण्यात येईल.

**१२.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मुंबई :
दिनांक : १३ **डिसेंबर, २०१०**

**दी. प्र.मिरजकर**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारिरीक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**